


सायं दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६० वा | मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# शेतकरी उद्ध्वस्त; सरकार अजून पंचनाम्यात!

## शेतकऱ्यांच्या जखमेवर तुटपुंजी मदत नको; हेक्टरी ५० हजार द्या!–रोहित पवार

नांदेड (कटूसत्य वृत्त):- ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाने लांबवलेल्या दडीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागावर दुष्काळाचे सावट अधिकच गडद झाले आहे. राज्यात एकूण पावसाची १७ टक्के तूट नोंदली गेली असून, मराठवाड्यात ही तूट तब्बल ३५ टक्क्यांवर पोहोचली आहे. सर्वाधिक चिंताजनक परिस्थिती सोलापूर जिल्ह्याची असून, १ जून ते १८ सप्टेंबर या कालावधीत तब्बल ५७ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे खरीप पिकांचे नुकसान, रब्बीच्या पेरणीवरील संकट, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई आणि पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्न अशा अनेक आघाड्यांवर ग्रामीण महाराष्ट्राची चिंता वाढली आहे.

या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, राज्य सरकारनेही परिस्थिती गांभीर्याने घेतली असून, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता आवश्यक उपाययोजना सुरू केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी केवळ पंचनामे आणि विम्याच्या मदतीवर न थांबता सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये आणि शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली.



आ.रोहित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील विविध भागांत शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन पिकांची पाहणी केली. यंदा पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनचे पीक करपून गेले आहे. काही ठिकाणी पीक हिरवे दिसत असले तरी त्याला शेंगा लागलेल्या नाहीत. त्यामुळे या पिकातून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्याची शक्यता अत्यल्प आहे. पुढील हंगाम कसा उभा करायचा, हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. शेतकऱ्यांशी संवाद साधताना आ.पवार यांनी चिंता व्यक्त केली.

नांदेड जिल्ह्यात सुमारे साडेसहा लाख हेक्टर क्षेत्र पिकांखाली असून त्यापैकी जवळपास पाच लाख हेक्टरवर सोयाबीन, तर सुमारे एक लाख हेक्टरवर कपाशीची लागवड केली जाते. सोयाबीनच्या लागवडीसाठी एकरी सुमारे ३० हजार रुपये, तर हेक्टरी सुमारे ७५ हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. यंदाच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना उत्पादनाच्या तुलनेत मोठा तोटा सहन करावा लागत आहे.

पाच लाख हेक्टरवरील सोयाबीनचे नुकसान सुमारे तीन हजार कोटी रुपये, तर कपाशीचे नुकसान सुमारे एक हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला. ऊस आणि अन्य पिकांचे नुकसान वेगळे असून, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे एकूण नुकसान सुमारे चार हजार कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते, असे पवार म्हणाले.

या नुकसानीच्या तुलनेत पीक विम्यातून मिळणारी मदत अपुरी ठरणार आहे. सुमारे ५५० कोटी रुपये पीक विम्यातून मिळाले तरी उर्वरित मोठ्या नुकसानीची भरपाई कोण करणार, असा सवाल पवार यांनी उपस्थित केला. त्यामुळे सरकारने विशेष मदत जाहीर करून किमान हेक्टरी ५० हजार रुपये आणि शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपये द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार मिळणारी मदत नुकसानीच्या तुलनेत अत्यल्प असल्याचे सांगत

(पान २ वर)

**सोलापूर सर्वाधिक तुटीत; मराठवाड्याचीही अवस्था गंभीर**

भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात १८ सप्टेंबरपर्यंत पावसाची एकूण १७ टक्के तूट आहे. मात्र विभागनिहाय आणि जिल्हानिहाय परिस्थितीत मोठी तफावत दिसून येत आहे. सोलापूरमध्ये ५७ टक्के, मराठवाड्यात ३५ टक्के आणि विदर्भात २८ टक्के तूट नोंदली गेली आहे.

त्यामुळे राज्यात सरासरी पाऊस झाला किंवा नाही, यापेक्षा पाऊस नेमका कुठे, किती आणि कोणत्या कालावधीत झाला, हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. पावसाच्या लांबलेल्या खंडामुळे अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी खरीप पिकांना पाण्याचा ताण बसला असून, रब्बी हंगामासाठी जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध होण्याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**'केंद्राची वाट पाहणार नाही'; फडणवीसांचा दावा**

दुष्काळी परिस्थितीबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारने परिस्थिती गांभीर्याने घेतल्याचे स्पष्ट केले. शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या योजनांसोबतच थेट आर्थिक मदत, पिण्याचे पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता याबाबत नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. एनडीआरएफच्या माध्यमातून केंद्राकडून मदत घेण्याची प्रक्रिया केली जाणार असली, तरी त्यासाठी आवश्यक पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू होईपर्यंत राज्य सरकार हातावर हात ठेवून बसणार नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. ५ ऑक्टोबरनंतर पंचनामे सुरू होईपर्यंत न थांबता आतापासूनच तयारी सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## पुढील वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने पाणी आरक्षणाचे नियोजन करावे-पालकमंत्री गोरे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. सद्यस्थितीत खरीप हंगामातील सुमारे ८० ते ८५ टक्के पिकांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. पुढील पंधरा दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास पिकांचे नुकसान आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पुढील वर्षभर जिल्ह्यात पिण्याचे पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने पाणी आरक्षणाचे नियोजन करावे. याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत शासनास सादर करावा, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.




नियोजन समिती सभागृहात आयोजित टंचाई परिस्थितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे, आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, राजू खरे, नारायण पाटील, अभिजीत पाटील, उजनी धरण व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर, भीमा कालवा व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता धीरज साळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देऊन नियोजन**

पालकमंत्री गोरे यांनी जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमधील पाणीसाठ्याची सद्यस्थिती जाणून घेतली. जलसंपदा विभाग व जिल्हा प्रशासनाने उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याचे दीर्घकालीन नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सध्याची टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनीही पाण्याच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन सिंचनासाठी पाणी सोडण्याबाबत निर्णय घेताना पिण्याच्या पाण्याची गरज आणि उपलब्ध पाणीसाठा यांचा समतोल राखावा. शेतकरी व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय ठेवावा. जलसंपदा विभागाने जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधील पाणीसाठ्याची सद्यस्थिती दर्शविणारा माहितीपत्रक अथवा चार्ट उपलब्ध करून द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

**टँकर मंजुरीसाठी ४८ तासांची कार्यवाही**

टंचाईग्रस्त गावातून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रस्तावाला

(पान २ वर)

## तात्काळ दुष्काळ जाहीर करा यासाठी चटणी भाकरी आंदोलन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शेतकऱ्यांसाठी तात्काळ दुष्काळ जाहीर करून नुकसानभरपाई व एकरी एक लाख रुपये सरसकट मदत द्यावी, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने कृषीमंत्री व इतर मंत्र्यांच्या विरोधात चार हुतात्मा पुतळ्याजवळ सकाळी ११ वाजता चटणी-भाकर खाऊन निषेध आंदोलन करण्यात आले.



यावेळी शेतकऱ्यांनी शेतातील करपून गेलेले सोयाबीन चौकामध्ये आणले होते त्याचबरोबर सरकारला भेट म्हणून शेणाची टोपली सुद्धा आणली होती.

शेतकरी आर्थिक संकटात असताना शासनाने ठोस निर्णय घ्यावा, पिकांचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

''शेतकरी संकटात, मंत्री काजू-बदामात; दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांना न्याय द्या!'' सुकामेवा नाही शेण खावा अशा घोषणांद्वारे शासनाचा निषेध करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले शहराध्यक्ष वैभव गायकवाड वकील आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे प्रकाश व्यवहारे तनवीर शेख शाहू लामकानी ज्ञानेश्वर भोसले दिनकर माने राहुल सावंत तानाजी टोणपे रोहण माने आधी उपस्थित होते.

## दुष्काळी परिस्थिती गंभीर, आ.अभिजीत पाटलांनी टंचाई बैठकीत उठवला आवाज

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यासह माढा विधानसभा मतदारसंघावर दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असून पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. शेतातील उभी



पिके पाण्याअभावी करपू लागली असून अनेक गाव-वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर 'नियम-अटींच्या कचाट्यात शेतकऱ्यांना अडकवू नका; तातडीने पाणी उपलब्ध करून द्या,' अशी ठाम मागणी आमदार अभिजीत आबा पाटील यांनी केली. त्यास पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांनी सकारात्मक आश्वासन दिले.

सोलापूर येथील नियोजन भवनात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठक पार पडली. यावेळी माढा मतदारसंघासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या टंचाईच्या परिस्थितीकडे आ. अभिजित पाटील यांनी शासनाचे लक्ष वेधले. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेकांच्या घरांचेही नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला. त्या संकटातून सावरण्याची संधी मिळण्यापूर्वीच यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांवर पुन्हा संकट कोसळले आहे.

सध्या अनेक भागांत पिकांना पाण्याची नितांत गरज असताना उपलब्ध पाणीसाठे मर्यादित होत आहेत. शेतातील उभी पिके वाचविण्यासाठी शेतकरी धडपडत असून पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दुसरीकडे गाव-वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता भासू लागली आहे. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता हा देखील गंभीर प्रश्न बनत चालला आहे.

टंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेताना केवळ बैठका,

(पान २ वर)

> **''शेतकऱ्यांसमोर आज पीक वाचविण्याचे मोठे संकट उभे आहे. पिके करपत आहेत, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यामुळे बैठका, पंचनामे, अहवाल आणि कागदावरील आकडे पुरेसे नाहीत. प्रत्यक्ष शेताच्या बांधावरची परिस्थिती पाहून तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना नियम-अटी लावून अडवू नका; त्यांना पाणी द्या आणि त्यांचे पीक वाचवा.''**
>
> **–आमदार अभिजीत पाटील, माढा विधानसभा**




## शहराच्या विकासासाठी भरघोस निधी देणार आ.राजू खरे यांची ग्वाही

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- शहराचा विकास रस्ते, इमारती किंवा उद्योग यापुरता मर्यादित नसतो, तर नागरिकांच्या जीवनमानात आनंद, आरोग्य आणि समाधान वाढवणाऱ्या सुविधा देखील निर्माण होणे आवश्यक असते. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या माध्यमातून अत्याधुनिक सोईसुविधा असलेले उद्यान प्रभाग क्रमांक ९ मध्ये निर्माण होणार असून नमो उद्यानातून मोहोळ शहराच्या वैभवात अधिक भर पडेल, असे प्रतिपादन मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू खरे यांनी केले.



मोहोळ शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये नगरसेविका सरताज सरफराज सय्यद यांच्या प्रयत्नातून भव्य दिव्य अशा उभारण्यात येणाऱ्या उद्यानाचे शुभारंभ रविवार २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वा. करण्यात आले. या उद्यानाचे भूमिपूजन होळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू खरे यांच्या हस्ते करण्यात आले.

शहरात मुलभूत सुविधांबरोबरच शहराचा शाश्वत विकास आम्ही करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नमो उद्यानात खुली व्यायाम शाळा, मुलांचे खेळाचे साहित्य, व्यासपीठ, योगासाठी बैठक व्यवस्था, चालण्यासाठी वॉकिंग ट्रॅक केला जाणार आहे. शहराच्या दक्षिण भागाच्या विकासाची सुरुवात यामुळे होणार असून या उद्यानामुळे शहराच्या विकासात भर पडणार आहे. यावेळी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब गायकवाड, पद्माकर आप्पा देशमुख, विकी देशमुख, सरफराज सय्यद, नगरसेवक चैतन्य देशमुख, सचिन जाधव, दिलीप गायकवाड, सुमित पवार, बापू आठवले, समजीक कारंडे, बाळासाहेब कारंडे, दीपक मडीखांबे,शाबाज शेख, जमीर शेख, सद्दाम शेख, अमीर शेख, नूर हुसेन शेख, किरण पोपळकर, नागेश पवार, सुदाम शिंगाडे, शाकीर मुजावर, नवाज शेख, वसीम हरणमरे, सद्दाम तवक्कल इत्यादी मान्यवरासह प्रभाग क्रमांक नऊ, गुलमोहर पार्क आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपसथित.

> प्रभाग क्रमांक नऊच्या जनतेने आमच्यावर विश्वास ठेवत नगरसेवक होण्याची संधी दिली दिलेल्या संधीतून प्रभागाचा विकास कसा होईल या हेतूने प्रभागाच्या विकासासाठी आमदार राजू खरे यांच्या माध्यमातून प्रभागासाठी निधी इथून घेऊन प्रभागातील विकास कामे करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. –सरताज सरफराज सय्यद नगरसेविका मोहोळ नगरपरिषद

## संपादकीय

# हा कसला 'समान' नागरी कायदा?

भाजप तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये पुढील तीन वर्षांत म्हणजे २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू केला जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत केल्यावर त्याला काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांकडून विरोध होणे स्वाभाविक होते.

पण विशेष म्हणजे भाजपच्या मित्र पक्षांकडून समान नागरी कायद्याच्या विरोधात सूर उमटू लागला आहे. राज्यांनी समान नागरी कायद्यासाठी पुढाकार घेणे म्हणजे 'मागील दाराने' हा कायदा मंजूर करण्यासारखेच, हा जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरोखरीच महत्त्वाचा आहे. राज्यांवर हा कायदा मंजूर करण्यासाठी दबाव आणण्यापेक्षा संसदेने हा कायदा लागू केल्यास तो देशभर लागू होईल, अशी ओमर अब्दुल्ला यांची भूमिकाही योग्यच. संसेदेने कायदा केल्यास तो देशभर लागू होतो. समान नागरी कायद्याबाबत अमित शहा यांनी भाजप किंवा मित्र पक्षांची राज्ये असलेल्या २१ राज्यांचा उल्लेख केल्याने केंद्राच्या एकूणच भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होते.

खरे तर समान नागरी कायदा हा भाजपच्या जाहीरनाम्यातील पारंपारिक विषय. अयोध्येत राम मंदिराची उभारणी, जम्मू आणि काश्मीरसाठी ३७० व्या कलमानुसार लागू असलेले विशेषाधिकार रद्द करणे, समान नागरी कायदा या संघ परिवार आणि भाजपच्या अनेक वर्षांच्या मागण्या. यापैकी अयोध्येत राम मंदिर उभारण्यात आले. जम्मू आणि काश्मीरसाठी लागू असलेले ३७० वे कलम रद्द करण्यात आले. मग समान नागरी कायदा संसदेत मंजूर न करता भाजप किंवा मित्र पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांपुरताच सीमित का ? तर समान नागरी कायद्यातील काही तरतुदींना विविध राजकीय पक्ष, धार्मिक संघटना, आदिवासींच्या संघटनांचा तीव्र विरोध आहे. यापैकी आदिवासी समाजाला समान नागरी कायद्याच्या कक्षेतून वगळण्याचे आश्वासन गृहमंत्री अमित शहा व भाजपने यापूर्वीच दिले आहे. यानुसार गुजरात, आसाम, मध्य प्रदेश या भाजपशासित राज्यांनी समान नागरी कायदा मंजूर करताना आदिवासींनी या कायद्याच्या कक्षेतून वगळले आहे.

भाजपशासित किंवा मित्र पक्षांच्या राज्यांत समान नागरी कायदा तीन वर्षांत लागू करण्याची घोषणा अमित शहा यांनी करताच बिहारमधील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलातून विरोधी प्रतिक्रिया उमटली. अल्पसंख्याक मतदार दुरावण्याची भीती लक्षात घेता पक्षाच्या काही नेत्यांनी बिहारमध्ये हा कायदा नकोच अशी भूमिका घेतली. 'विधेयकातील तरतुदींचा अभ्यास करून मगच संयुक्त जनता दलाकडून भूमिका जाहीर केली जाईल', असे उपमुखमंत्री विजयकुमार चौधरी यांना स्पष्ट करावे लागले. ईशान्य भारतात भाजपच्या मित्र पक्षांचा या कायद्याला सक्त विरोध आहे. मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनर्ड संगमा यांनी आपल्या राज्यात समान नागरी कायदा नकोच, अशी भूमिका यापूर्वीच मांडली आहे. नागालॅण्डचा विरोध आहे. मिझोरामच्या मुख्यमंत्र्यांचाही या कायद्याला विरोध केला आहे.

समान नागरी कायद्यासाठी भाजपने राज्य विधिमंडळाचा मार्ग स्वीकारला आहे. आतापर्यंत उत्तराखंड, आसाम, गुजरात आणि मध्य प्रदेश या चार भाजपशासित राज्यांनी समान नागरी कायदा मंजूर केला. समान नागरी कायदा संसदेत मंजूर करण्याचे भाजपकडून टाळले जात आहे. केंद्रात सत्ताधारी असलेला भाजप राज्यांवर ही जबाबदारी का ढकलत आहे याची चर्चा सध्या सुरू आहे. मतदारसंघांची पुनर्रचना व त्या अंतर्गत महिला आरक्षण या संदर्भातील घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत दोन तृतीयांश सदस्यांचे पाठबळ न मिळाल्याने मंजूर होऊ शकले नाही. तसेच समान नागरी कायदा संसदेत मंजूर करणे भाजपसाठी राजकीयदृष्ट्याही अडचणीचे मानले जाते. विवाह, घटस्फोट, दत्तक योजना, मृत्यूपत्र, उत्तराधिकारी नेमणे, संयुक्त कुटुंब पद्धती असे विविध विषय हे केंद्र व राज्य सरकारांच्या समवर्ती सूचीत समाविष्ट आहेत.

या विषयांवर कायदे करण्याचे केंद्र व राज्यांना अधिकार असतात. समान नागरी कायद्यासाठी हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसाहक्क कायदा, हिंदू दत्तक कायदा यामध्ये सुधारणा करावी लागेल. तसेच आदिवासींना या कायद्याच्या कक्षेत समाविष्ट करणे अवघड आहे. हे सारे भाजपसाठी राजकीयदृष्ट्या अडचणीचे आहे. त्यासाठीच राज्यांच्या पातळीवर समान नागरी कायदा करून आवश्यक तशा तरतुदी करणे शक्य होते. स्थानिक रितीरिवाज, धार्मिक परंपरा यांचा आवश्यकतेनुसार कायद्यात समाविष्ट करता येतात. गेल्या १२ वर्षांत मोदी सरकारला भूसंपादन आणि शेतकरी कायद्यांवरून माघार घ्यावी लागली. मतदारसंघ पुनर्रचना घटना दुरुस्ती विधेयकाला पुरेसे संख्याबळ मिळाले नाही. आता समान नागरी कायद्यासाठी राज्यांवर जबाबदारी ढकलून भाजपने एक प्रकारे माघारच घेतली आहे. त्यामुळे हा कायदा आता राष्ट्रीय पातळीवर होण्याची फारशी शक्यता दिसत नाही.

# शेतकरी उपाशी,मंत्री सुक्या मेव्याशी ;वारे! व्वा! कृषिप्रधान देशाचे मंत्री !थोडीशी जणांची नाही तर मनाची ठेवा!

शेतकऱ्यांच्या डोक्यावर जीवघेणा दुष्काळ आणि मंत्र्यांचा मेव्यावर ताव;शेतकऱ्यांनी जगावे की मरावे!एकीकडे राज्यावर दुष्काळाचे सावट,पाणी टंचाईचे सावट, देशाच्या ५० टक्के भागात दुष्काळाचे संकट,पीक करपले, शेतकऱ्यांचे अर्थचक्र बिघडले आणि देशात अलनिनोमुळे हवामानातील बदल यामुळे शेतकऱ्यांपुढे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु शेतकरी कोणाला सांगू शकत नाही आणि ज्याला सांगायला जातात ते मौजमस्ती करतात असे आहेत राज्याचे कृषिमंत्री अशा परिस्थितीत जर मंत्री महोदय काजू-बदाम खात असेल तर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार! इकडे शेतकरी मरतोय आणि मंत्री महोदय काजू बदाम खातो या बाबतीत थोडी जनाची नाहीतर मनाची लाज वाटायला पाहिजे. कारण मंत्र्यांने सर्व लाजा शरमा विकून बैठकीमध्ये काजू बदामवर ताव मारतात हे राज्यासह देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.काजूबदामपेक्षा साधा नास्ता खायला यांना लाज वाटते का?या संपूर्ण घटनेवरून देशातील जनतेला लक्षात यायला पाहिजे की, कोणताही कामधंदा किंवा घाम न गाळता राजकीय पुढारी करोडो रुपयांची चल-अचल जमवितात आणि शेतकऱ्यांच्या समस्या जशाच्या तशाच रहातात तर हे कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत!राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे हे कोरडा दुष्काळ पाहणी दौरा करण्यासाठी मराठवाडा दौऱ्यावर असतांना.नांदेडमध्ये दुष्काळ दौरा करण्याआधी प्रशासकीय बैठकीत मंत्री, आमदार,खासदार यांनी अधिकाऱ्यांनी आणलेल्या काजू बदामवर चांगलाच ताव मारला.त्यामुळे कोरड्या दुष्काळात काजू-बदामाची मेजवानी घेणाऱ्या लोकप्रतिनिधीवर टीकेची झोड उठली.यानंतर अधिकाऱ्यांमुळे आम्ही बदनाम होतो,असा संताप मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी व्यक्त केला.मंत्री महोदयांचा हा कसला संताप म्हणावा ही तर लीपापोती म्हणावी लागेल.कारण मिटींगामध्ये सुका मेवा खासकरून आमदार, खासदार,मंत्री यांना हवा असतो व तोही सरकारच्या(जनतेच्या )पैशातून आणि त्याची आतुरतेने वाट सुध्दा पहात असतात.अशा परिस्थितीत मिटिंगांच्या काळात स्वतः मंत्रीच सुक्या मेव्याची मागणी करतात आणि आता अंगलट आले म्हणून अधिकाऱ्यांवर खापर फोडता ही बाब योग्य नाही.जेव्हा-जेव्हा राजकीय पुढारी चुका करतात तेव्हा-तेव्हा सर्वच चुकांचे खापर प्रशासकीय अधिकाऱ्यांवर फोडल्या जाते.राज्यातील सर्वच राजकीय पुढारी निवडणूकीच्या काळात सांगतात की मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे आणि निवडून आल्यानंतर सुका मेवा खाऊन याच शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करतात याची लाज मेवा खाणाऱ्या मंत्र्यांना,आमदारांना व खासदारांना वाटायला पाहिजे.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्याचे सोडून मौजमस्ती करण्यासाठी मंत्री दुष्काळग्रस्त भागाचे दौरे करतात ही बाब



मंत्र्यांच्या मेवा पार्टीवरून सिद्ध होते.आज शेतकरी,शेतमजूर याचे हालबेहाल आहे,अति दुर्गम भागातील ग्रामस्थ मुलभूत सुविधांपासून कोसो दूर आहेत,शेतकऱ्यांवर आलेले संकट त्याला व त्याच्या कुटुंबीयांना सहन होत नाही अशा कठीण प्रसंगी आत्महत्येचा सहारा घेतात, त्याचप्रमाणे राज्यात महागाई आभाळाला टेकली आहे व बेरोजगारीची समस्या अत्यंत गंभीर परिस्थिती येऊन ठेपली आहे.एवढ्या मोठ्या गंभीर आणि जटील समस्यांचा डोंगर राज्यासमोर असतांना कृषिमंत्री, आमदार खासदार सुक्या मेव्याची मेजवानी करतात ही अत्यंत शरमेची, लाजीरवाणी आणि निंदनीय बाब आहे.काजू-बदाम पिकविणारा सुका मेवा खात नाही आणि स्वतःला लोकप्रतिनिधी,समाजसेवक म्हणणारे मंत्री-आमदार-खासदार काजू बदाम खातात; यांमुळेच शेतकरी आत्महत्या तर करीत नाही ना! असाही प्रश्न उपस्थित होतो.कारण अन्नदाता शेतकरी जो अन्न-धान्य, फळ-फळावळ, सुका मेवा व अन्य आवश्यक वस्तू पिकवितो तो त्या वस्तू खावू शकत नाही.कारण सरकार कडून त्यांना त्यांच्या वस्तूंना योग्य भाव मिळत नाही.त्यामुळे आज राज्यासह देशात शेतकरी अत्यंत गरीब परिस्थितीत असल्याचे दिसून येते.आज आपण श्रीमंत आणि गरीब या दोन शब्दांचा विचार केला तर राज्यातील शेतकरी मनाने सर्वात जास्त श्रीमंत आहे.परंतु त्यांना खिळखिळा करण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनी व दलालांनी केले.आज शेतकऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आहे तरीही तो आर्थिक दृष्ट्या शुन्य असून अत्यंत गरीब आहे.याउलट जो व्यक्ती पाच वर्षांसाठी आमदार-खासदार- मंत्री किंवा लोकप्रतिनिधी होतो तो आज करोडपती असल्याचे दिसून येते.त्याच्याजवळ गाडी, बंगला, सरकारी सुविधा, पेंशन,भत्ते अशा प्रकारच्या संपूर्ण सुविधा घाम न गाळता लोकप्रतिनिधींना आपोआप मिळतात.या उलट शेतकऱ्यांना शेतात मेहनत,काबाडकष्ट करू सुध्दा एवढा पैसा मिळत नाही हे कृषिप्रधान देशाचे व स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. एकीकडे शेतकरी दुष्काळाने होरपळत आहे आणि राज्याचे लोकप्रतिनिधी काजू बदाम खाण्यात मग्न आहेत ही शेतकऱ्यांच्या प्रती अत्यंत निंदनीय आणि दुःखद बाब आहे. देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अंतरआत्म्याच्या वेदना कधीच जाणून घेतल्या नाहीत.शेतकरी नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहातात आणि राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधी एसीत रहातात.त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या राजकीय पुढारी कधीच समजू शकणार नाही आणि समजणार नाही.राज्याच्या आमदार-खासदार-मंत्री आणि लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांच्या सहवासात कमीत कमी एक महिना राहून पहावे तेव्हा त्यांना काजू-बदाम आणि चटणी-भाकर मधील खरा फरक दिसून येईल.कारण आजही शेतकऱ्यांना काजू बदामपेक्षा चटणी-भाकर जास्त गोड वाटते.मुख्यमंत्री म्हणतात की आपल्याकडे बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफूड आणून ठेवतात.परंतू सरकारने या गोष्टी टाळल्या पाहिजेत.कारण एकीकडे शेतकरी दुःखात आणि प्रशासनाकडून मंत्र्यांना सुक्या मेव्याची मेजवानी ही गोष्ट कोणत्याही ऍंगलने हजम होत नाही.मुख्यमंत्र्यांनी सुक्या मेव्याच्या बाबतीत प्रशासनाला कारणीभूत ठरवू नये.सरकारने जर बैठकांमध्ये सुक्या मेव्याची पध्दत बंद केली तर राज्याचा खर्च आपोआप कमी होईल व शेतकऱ्यांच्या प्रती मंत्र्यांमध्ये माणुसकी दिसून येईल.मुख्यमंत्री म्हणतात की आपल्याकडे बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफूड आणून ठेवतात याचाच अर्थ असा की,राज्यावर ड्रायफुडच्या बाबतीत सरकारचा(जनतेचा )करोडोंचा खर्च होत असावा. त्यामुळे यावर सरकारने नियंत्रण आणने गरजेचे असुन बैठकामधील ड्रायफुडची मेजवानी बंद करून खाण्यावर नियंत्रण ठेवावे व साधा चिवडा ठेवायला पाहिजे यामुळे राज्याचा खर्च वाचेल. बैठकामधील ड्रायफुडची पध्दत लक्षात घेता सरकारने यावर नियंत्रण ठेवून शेतकऱ्यांच्या समस्यांवर जातीने लक्ष केंद्रित करावे आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवितांना बैठकांमध्ये चटणी-भाकर ठेवून शेतकऱ्यांचा मानसन्मान करावा.सुका मेवा आमदार-खासदार-मंत्री यांनी अवश्य भरपूर खावा यात कोणाचीही मनाई नाही.परंतु जनतेच्या पैशातुन नाही तर स्वतःच्या पैशाने खावा.जय जवान जय किसान!जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**



## * पान १ वरुन *

*** शेतकरी उद्ध्वस्त; सरकार अजून.....**

पवार म्हणाले की, पाच लाख हेक्टर क्षेत्रासाठी हेक्टरी सुमारे आठ हजार रुपये मदत मिळाली तरी तिची एकूण रक्कम ५०० ते ६०० कोटी रुपयांच्या आसपास राहील. प्रत्यक्ष नुकसान हजारो कोटी रुपयांचे असताना एवढ्या तुटपुंज्या मदतीतून शेतकरी पुन्हा उभा कसा राहणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. जनावरांसाठी चारा छावण्या आणि आवश्यक ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

नांदेडपुरतीच ही परिस्थिती नसून राज्यातील सुमारे २० जिल्ह्यांतील आणि २८० तालुक्यांतील शेतकरी अशाच संकटाला सामोरे जात असल्याचा दावा पवार यांनी केला. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्यास विलंब न करता तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. ५ ऑक्टोबरपर्यंत प्रतीक्षा करण्याची गरज काय, असा सवाल करत परतीच्या पावसामुळे काही पिके वरवर हिरवी दिसल्यास उपग्रहाच्या आधारे नुकसानीच्या आकलनावर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. कर्नाटकात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे; त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने निर्णय घेऊन पंचनामे सुरू करावेत, असे पवार म्हणाले. नमुन्याच्या आधारे होणाऱ्या पंचनाम्याऐवजी प्रत्यक्ष शेतपातळीवरील नुकसानीची नोंद घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पीक विम्याच्या प्रक्रियेवरही पवार यांनी प्रश्न उपस्थित केले. विम्याच्या विविध निकषांपैकी आवश्यक ट्रिगर लागू करून स्थानिक आपत्तीच्या निकषांतून शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळणे गरजेचे आहे. पीक कापणी प्रयोगाला होणाऱ्या विलंबामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. सोयाबीन उत्पादकांना विम्याची संभाव्य २० ते २५ टक्के मदत वेळेत मिळावी आणि याच हंगामापासून त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

कृषिमंत्र्यांनी मराठवाडा आणि विदर्भाचा दौरा करून पिकांच्या नुकसानीची पाहणी केली असली तरी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदतीबाबत ठोस निर्णय अद्याप झालेला नाही, अशी टीका पवार यांनी केली. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन केवळ छायाचित्रे आणि प्रसिद्धी करण्यापेक्षा त्यांच्या खात्यावर प्रत्यक्ष मदत जमा करणे महत्त्वाचे आहे. सरकारने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली तर शेतकरीच सरकारचे अभिनंदन करतील, असे ते म्हणाले.

शेतकरी आणि शेतमजुरांच्या हातात दैनंदिन गरजा भागविण्यासाठीही पैसे उरलेले नाहीत. कर्जमाफीच्या मागणीसाठी आंदोलने झाली; मात्र अनेक शेतकरी अद्याप कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असल्याचा दावा पवार यांनी केला. कर्जमाफी पूर्ण झाली नाही तर नवीन पीककर्ज मिळण्याचा मार्गही अडतो. त्यामुळे कर्जमाफीबरोबरच पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना सहज आणि पुरेसे पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

सोयाबीन, कपाशी आणि तुरीला अपेक्षित दर मिळत नसताना खत, डीएपी, पेट्रोल-डिझेल आणि अन्य शेती निविष्ठांच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढला असून उत्पन्न मात्र अनिश्चित झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक आधार मिळणे आवश्यक आहे. अन्यथा ग्रामीण भागातील आर्थिक संकट आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याचे पवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी दुष्काळाची घोषणा लवकरात लवकर करून शेतकरी आणि शेतमजुरांना मदत द्यावी. तसेच एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घ्यावा आणि लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या पात्र महिलांचा फेरविचार करून त्यांना पुन्हा योजनेत समाविष्ट करावे, अशी मागणीही पवार यांनी केली. आम्ही पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शेतकरी बांधव उपस्थित होते.

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचे आश्वासन!

विविध भरती परीक्षांतील पेपरफुटीमुळे त्रस्त असलेल्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांशी नांदेडमध्ये आ. रोहित पवार यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या विविध अडचणी जाणून घेत त्यांच्याशी चर्चा केली. एमपीएससीच्या कारभारातील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रश्नासाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात शक्य तितक्या विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अडचणीत त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा विश्वासही पवार यांनी दिला. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*** पुढील वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध राहील.....**

४८ तासांच्या आत मंजुरी मिळेल, याबाबत दक्षता घ्यावी. तहसीलदार व प्रांताधिकाऱ्यांनी टँकरबाबत गावनिहाय योग्य नियोजन करावे. जिल्हा परिषद स्तरावर टँकर व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्यवस्था करून प्रत्येक टँकरच्या फेऱ्या, पाणीपुरवठा आणि खर्चाचा योग्य हिशोब ठेवावा, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

सद्यस्थितीत जिल्ह्यात ६८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. आगामी काळात पाऊस न झाल्यास दररोज आणखी गावांकडून टँकरची मागणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने संभाव्य परिस्थितीचा विचार करून आधीच नियोजन करावे. टँकर सुरू करण्याबाबतची कार्यवाही वेळेत होते की नाही, याची जबाबदारी संबंधित प्रांताधिकाऱ्यांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पशुधनासाठी पाणी व चारा उपलब्धतेचे नियोजन

जिल्ह्यातील जनावरांसाठी आवश्यक पाणी व चारा उपलब्ध राहील, याचेही नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. तहसीलदार, प्रांताधिकारी व कृषी अधिकाऱ्यांनी टंचाईच्या अनुषंगाने सादर करावयाचे अहवाल वस्तुनिष्ठ व अचूक पद्धतीने सादर करावेत. दुष्काळसदृश परिस्थितीत एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा २७ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध

जिल्ह्यात १८ लाखांपेक्षा अधिक पशुधन असून सुमारे २७ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. चारा पिकांच्या पेरणीसाठी ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यापैकी प्रारंभी २ कोटी रुपयांच्या निधीतून चारा पिकांची पेरणी करण्यात आली आहे. मागील महिन्यात अतिरिक्त १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभागाने उपलब्ध चाऱ्याचे योग्य नियोजन करावे, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहनही पालकमंत्री गोरे यांनी केले.

सप्टेंबरपर्यंतच्या पाणीटंचाईचा आराखडा तयार

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान व पाणी उपलब्धतेबाबत माहिती दिली. एल निनोच्या प्रभावामुळे जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. उजनी धरण भरल्यानंतर उपलब्ध अतिरिक्त पाणी जिल्ह्यातील काही लघु व मध्यम प्रकल्पांमध्ये सोडण्यात आले आहे. सप्टेंबरपर्यंतच्या संभाव्य पाणीटंचाईचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. पाणी व चारा उपलब्धतेचे नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

उजनी धरणातील पाणीसाठ्याचा आढावा

उजनी धरण व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणीसाठ्याची सद्यस्थिती व सिंचन नियोजनाची माहिती दिली. उजनी धरणात सद्यस्थितीत सुमारे ९५ टक्के पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच १५ ऑक्टोबरपर्यंत खरीप हंगामासाठी सिंचनाचे रोटेशन सुरू राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

लोकप्रतिनिधी यांच्या सूचना

बैठकीत लोकप्रतिनिधींनी पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी जलसंपदा विभागाने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सूचना केल्या. जिल्ह्यातील भीमा व सीना नदीवरील सुमारे ९० कोल्हापुरी बंधाऱ्यांमधून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. या पाण्याचे योग्य नियोजन करून पुढील काळात अधिकाधिक पाणीसाठा उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी प्राप्त झाल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना वेळेत पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही लोकप्रतिनिधींनी केली.

*** दुष्काळी परिस्थिती गंभीर.....**

पंचनामे, अहवाल आणि कागदावरील आकडे यावर समाधान न मानता प्रशासनाने प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन परिस्थिती पाहण्याची गरज असल्याचे आ. अभिजित पाटील यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चा करून वेळकाढूपणा न करता तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी आ. पाटील यांनी बैठकीत केली. पिकांना आवश्यक पाणी, गाव-वाड्यांतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता याबाबत प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या संकटातून आर्थिकदृष्ट्या सावरण्यापूर्वीच यंदाच्या अपुऱ्या पावसाने शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत देताना प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला नियम-अटींच्या फेऱ्यात न अडकवता शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा,'' अशी ठाम भूमिका आ. अभिजित पाटील यांनी मांडली. सोलापूर जिल्ह्यातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाकडून आता कोणत्या उपाययोजना केल्या जातात आणि शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नावर कितपत तातडीने निर्णय घेतला जातो, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

**वात्रटिका**

झोप उडते तेव्हा
कुठं कुठं शोधलं तुला
आणिक तुला धुंडाळला...
आता आला धावून जवा
आम्ही गाशा गुंडाळला...।।
चर्चा होती दुष्काळावर
तेव्हा कोणाला झोप लागते...
नजर फिरते रानावरून कधी
तेव्हा आमची झोप उडते...।।

**हणमंत पडवळ -धाराशिव**
**८६९८०६७५६६**

**सिलींग जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे आढेगांव - ता. मोहोळ जि. सोलापूर येथील शेतजमीन ग नं.३९२/४ क्षेत्र ०१ हे ४९ आर, पो.ख. क्षेत्र ०० है ०७ आर, एकुण क्षेत्र ०१ हे ५६ आर, आकार ०० रु ४ पैसे ही मिळकतीचे खातेदार श्रीमती- श्री. धनाजी भाऊ सुतार व इतर रा.- गोविंद राधा पॅलेस जवळ,पाटील नगर चिखली, चिखली बुद्रुक पुणे जि. पुणे. यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग-२ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता आमचे अशिल श्री. धनाजी भाऊ सुतार व इतर यांनी मा. अपर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहारांबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगीहक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत/तक्रार/हितसंबंध/अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचाही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राहय होणेसाठी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी. ता. १७/०९/२०२६

**ॲडव्होकेट- ॲड. मनोजकुमार एम . गावडे**
**पत्ता:- गट. नं. ९३६/१/अ/ ८, गुलमोहर पार्क, कुरुल रोड, मोहोळ. जि. सोलापूर . ९५०३९३२३०३**

**अशिल श्री. धनाजी भाऊ सुतार व इतर**
**पत्ता- रा.- गोविंद राधा पॅलेस जवळ, पाटील नगर चिखली, चिखली बुद्रुक पुणे जि.पुणे**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन- २१७३५५०५९२ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-2173550592 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

पत्ता-इंद्रभुवन,पुण्यश्लोक आप्पासाहेब वारदपथ,रेल्वेलाईन्स,सोलापूर-४१३००१.
नगरअभियंताकार्यालय, नागरीकामे
ई-मेल-ce.smc@gmail.com, मो.९४२२४५७९२२

जा.क्र.नगरअभियंता/नागरीकामे/२०२६-२७ दिनांक-२१/०९/२०२६

### -: जाहिर प्रसिध्दीकरण :-

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२६ करिता श्री. गणेश मुर्ती विसर्जन अनुषंगाने विभागीय कार्यालय क्र.१ ते ८ मध्ये श्री. गणेश मुर्तीचे संकलन करुन श्री. गणेश विसर्जन सोलापूर महानगरपालिके मार्फत करणेत येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळ व नागरिकांना आवाहन करणेत येते की, त्यांनी श्री. गणेश मुर्ती आपापल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या खालील नमुद संकलन केंद्रात आणून द्यावी.

तसेच ज्या गणेश भक्तांना व गणेश उत्सव मंडळ यांना विसर्जन ठिकाण/विहिर/कुंडामध्ये करावयाचे आहे. त्यांना विजर्सन ठिकाण/विहिर/कुंडामध्ये विजर्सन करणेची व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून केली आहे.

| | विभागीय कार्यालय क्र.१ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | सो.म.पा. शाळा नं.२१,न्यू बुधवार पेठ |
| २) | शिवानुभव मंगल कार्यालय |
| ३) | प्रसन्न हॉल,वसंत विहार |
| ४) | ज. रा. चंडक प्रशाला, बाळे |
| ५) | इंदिरा कन्या प्रशाला, शिंदे चौक |
| ६) | विठ्ठल मंदिर, जुनी पोलीस लाईन |
| ७) | शरदचंद्र पवार प्रशाला, उमा नगरी |

| | विभागीय कार्यालय क्र.२ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | जिल्हा परिषद शाळा, शेळगी |
| २) | जय भवानी प्रशाला, भवानी पेठ |

| | विभागीय कार्यालय क्र.३ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | संभाजीराव शिंदे प्रशाला, विडी घरकुल |
| २) | राज मेमोरियल इंग्रजी शाळा, विडी घरकुल |
| ३) | पावन गणपती, कर्णिक नगर |
| ४) | एम.आय.डी.सी.प्रिसिजन कारखाना जवळ,भुखंड क्र.६ व ७ खुली जागा |
| ५) | रोशन प्रशाला, किसान नगर |
| ६) | म.न.पा. शाळा क्र. ६, दाजी पेठ |

| | विभागीय कार्यालय क्र.४ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | मार्कंडेय नगर, जिल्हा परिषद शाळा |
| २) | माधव नगर, पद्ममारुती मंदिर |
| ३) | बुर्ला मंगल कार्यालय |
| ४) | इंदिरा नगर समाज मंदिर, ७० फूट रोड |
| ५) | म.न.पा.५ नं शाळा, भारतरत्न इंदिरा नगर |
| ६) | जि. प. शाळा, निलम नगर |
| ७) | केंगनाळकर शाळा |
| ८) | प्रगती लौंन्स, अंत्रोळीकर नगर |
| ९) | अथर्व मंगल कार्यालय |

| | विभागीय कार्यालय क्र.५ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | किल्लेदार मंगल कार्यालय आसरा |
| २) | गोविंदश्री मंगल कार्यालय जुळे सोलापूर |
| ३) | मातोश्री रखुमाबाई हत्तुरे मंगल कार्यालय, हत्तुरे वस्ती |

| | विभागीय कार्यालय क्र.६ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | सुंदराबाई डागा प्रशाला, दमाणी नगर |
| २) | थोबडे वस्ती समाज मंदिर, थोबडे वस्ती |
| ३) | राजस्व नगर सांस्कृतिक भवन |
| ४) | समृद्धी गार्डन |

| | विभागीय कार्यालय क्र.७ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, एम्प्लायमेंट चौक (खाजगी) |
| २) | मनपा उर्दू शाळा क्र. ३ |
| ३) | मनपा मराठी शाळा क्र. ३, दक्षिण कसबा |
| ४) | हुतात्मा स्मृती मंदिर |
| ५) | भोईराज समाज मंदिर शुक्रवार पेठ |
| ६) | डॉ. कोटणीस स्मारक भैय्या चौक |

| | विभागीय कार्यालय क्र.८ श्रीगणेश मुर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) | बोल्ली मंगल कार्यालय, अशोक चौक |
| २) | हनुमान मंदिर, बापुजी नगर, पटांगण शेजारी |
| ३) | श्री. मार्कंडेय उद्यान, व्हिव्हको प्रोसेस समोर |
| ४) | नियोजन भवन |
| ५) | जिल्हाधिकारी कार्यालय |
| ६) | दुर्गामाता मंदिर, मोदी |
| ७) | मनपा कॅम्प शाळा, सदर बझार |
| ८) | इन्डोर स्टेडियम, अश्विनी हॉस्पिटल जवळ |
| ९) | तायम्मा मंदिर, शास्त्री नगर, अभयहस्त चौक |

**संदिप कारंजे**
**अति आयुक्त-(२)**
**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

पत्ता-इंद्रभुवन,पुण्यश्लोक आप्पासाहेब वारदपथ,रेल्वेलाईन्स,सोलापूर-४१३००१.
नगरअभियंताकार्यालय, नागरीकामे
ई-मेल-ce.smc@gmail.com, मो.९४२२४५७९२२

जा.क्र.नगरअभियंता/नागरीकामे/२०२६-२७ दिनांक-२१/०९/२०२६

### -: जाहिर प्रसिध्दीकरण :-

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२६ करिता श्री. गणेश मुर्ती विसर्जन अनुषंगाने विभागीय कार्यालय क्र.१ ते ८ मध्ये श्री. गणेश मुर्तीचे संकलन करुन श्री. गणेश विसर्जन सोलापूर महानगरपालिके मार्फत करणेत येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळ व नागरिकांना आवाहन करणेत येते की, त्यांनी श्री. गणेश मुर्ती आपापल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या खालील नमुद संकलन केंद्रात आणून द्यावी.

तसेच ज्या गणेश भक्तांना व गणेश उत्सव मंडळ यांना विसर्जन ठिकाण/विहिर/कुंडामध्ये करावयाचे आहे. त्यांना विजर्सन ठिकाण/विहिर/कुंडामध्ये विजर्सन करणेची व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून केली आहे.

| अ.क्र. | विभागीय कार्यालय क्र. | श्री.गणेश मुर्ती विसर्जन ठिकाण/कुंड/विहिरी |
|---|---|---|
| १) | ०२ | हिप्परगा येथील खाण |
| २) | ०३ | एम.आय.डी.सी.ओपन स्पेस प्रिसिजन फॅक्ट्री जवळ भू.क्र.६ व ७-कृत्रिम कुंड |
| ३) | ०३ | म्हाडा विहिर,विडी घरकुल |
| ४) | ०५ | श्री छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) -(३ कृत्रिम कुंड) |
| ५) | ०६ | राजस्व नगर विहीर |
| ६) | ०७ | गणपती घाट दत्त चौक |
| ७) | ०७ | विष्णू घाट पासपोर्ट ऑफिस जवळ |
| ८) | ०७ | गणेश मूर्ती विसर्जन जुनी लक्ष्मी विष्णू चाळ |

**संदिप कारंजे**
**अति आयुक्त-(२)**
**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**

# अभियंता दिनानिमित्त सोलापूर विकास मंचाचा विकासाचा संकल्प

सोलापूर (कटूसत्य वृत्त :- अभियंता दिनानिमित्त सोलापूर विकास मंचाच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील अभियंते, तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते तसेच मंचाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्याबरोबरच सोलापूर शहर व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. सोलापूरच्या विकासासाठी पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, विमानसेवा, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, औद्योगिक वसाहती, आयटी क्षेत्र,



रोजगारनिर्मिती, शिक्षण, आरोग्य आणि नियोजनबद्ध शहरी विकास या विषयांवर तज्ज्ञांच्या सहभागातून ठोस काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. केवळ विकासाच्या समस्यांकडे लक्ष वेधून थांबण्याऐवजी संबंधित विषयांचा सखोल अभ्यास करून व्यवहार्य उपाययोजना सुचविणे आणि त्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन व प्रशासनासोबत समन्वयाने काम करणे, अशी भूमिका सोलापूर विकास मंचाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. अभियंता दिनाच्या निमित्ताने 'तज्ज्ञांचे ज्ञान, नागरिकांचा सहभाग आणि प्रशासनाशी समन्वय यांच्या माध्यमातून सक्षम, आधुनिक आणि विकसित सोलापूर घडविण्यासाठी एकत्रितपणे काम करूया', असा संदेश देण्यात आला.

यावेळी सोलापूर विकास मंचाचे सदस्य मिलिंद भोसले, केतन शहा, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, प्रा. प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, गणेश पेनगोंडा, तेजस गुर्जर, भारत पाटील, शुभांगी पाटील, वासुदेव आडकी, बाळासाहेब मोरे, विशाल जोग, अभय दुस्सल, अमोगसिद्ध कोरे, निखिल कंदिकटला, वसंत कुमार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने सोलापूरच्या विकासाच्या प्रश्नांवर तांत्रिक दृष्टिकोनातून सातत्याने अभ्यास, संवाद आणि पाठपुरावा करण्याची भूमिका मंचाच्या सदस्यांनी व्यक्त केली.

# गणेशोत्सवानिमित्त स्पर्धा परीक्षा व नोकरीच्या संधींवर मार्गदर्शन

कुमठे (कटूसत्य वृत्त):- कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात यंदाचा गणेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येत असून, गणेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. 'नाविन्यपूर्ण शिक्षण' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रा. ए. ए. सोनकांबळे यांनी गुंफले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या विविध संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, सहकार तपस्वी कै. ब्रह्मदेवदादा माने यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी प्रा. सोनकांबळे यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात स्वतःचे अस्तित्व टिकवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून ज्ञान संपादन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. 'ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ आहे', असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांनी बुद्धिमत्ता, विज्ञान, गणित, भाषा आणि इंग्रजी या विषयांवर प्रभुत्व मिळवावे, तसेच नियमितपणे वर्तमानपत्रांचे वाचन करावे, असे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना सामान्य ज्ञानासोबतच चालू घडामोडींची माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. संस्थेचे विश्वस्त व नगरसेवक जयकुमार माने यांनी विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारची व्याख्यानमाला सुरू करून त्यांना ज्ञान आणि करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असे मत प्रा. सोनकांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अंबादास रेडे होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणासोबतच स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. संजय जाधव, प्रा. हणमंत शिंदे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. विजय वाळके, प्रा. राजीव निकम, प्रा. बंडोपंत बाबर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. मनोज साठे यांनी केले. व्याख्यात्यांचा परिचय प्रा. विनोद थोरात यांनी करून दिला, तर आभार प्रा. संजय जाधव यांनी मानले.

# भाजप सोलापूर ग्रामीण पश्चिमची महत्त्वपूर्ण बैठक अकलूजमध्ये उत्साहात

करमाळा (कटूसत्य वृत्त):- भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक अकलूज येथील पाटीदार भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. नूतन जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र संयोजक विक्रमजी पावसकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत विविध विषयांवर मनोगत व्यक्त केले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भारतीय जनता पक्षाची विचारधारा, केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी



योजना आणि पक्षाची विविध अभियानं तळागाळातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. संघटना जितकी मजबूत, तितका पक्ष अधिक सक्षम. प्रत्येक बूथवर सक्रिय कार्यकर्ता आणि प्रभावी जनसंपर्क हेच भाजपच्या यशाचे सूत्र आहे, असे ते म्हणाले.माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी गाव तिथे शाखा, बूथ तिथे भाजपा हे अभियान प्रभावीपणे राबवून प्रत्येक बूथवर भाजपाच्या शाखा स्थापन करण्याचे आवाहन केले. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांनाच जबाबदाऱ्या मिळाल्या पाहिजेत आणि निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना पक्षात स्थान दिले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. माजी आमदार राम सातपुते यांनी युवकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत बूथ सक्षमीकरणासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन केले. पश्चिम महाराष्ट्र संयोजक विक्रमजी पावसकर यांनी पक्षाच्या विविध अभियानांचा आढावा घेत संघटना अधिक गतिमान आणि सक्षम करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने पूर्ण ताकदीने काम करण्याचे आवाहन केले. या बैठकीमध्ये सेवा संकल्प अभियान, सदस्य नोंदणी, पदवीधर मतदार नोंदणी, मन की बात तसेच आगामी संघटनात्मक कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी प्रदेश पातळीवरून प्राप्त झालेल्या राजकीय व सामाजिक अशा दोन महत्त्वपूर्ण प्रस्तावांना जिल्हा कार्यकारिणीने एकमताने मंजुरी दिली. या बैठकीस माढ्याचे नेते रणजीत शिंदे, सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, जिल्हा परिषद गटनेत्या रश्मी बागल, माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख, राजकुमार पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत, प्रणव मालक परिचारक, ज्येष्ठ नेते प्रकाशबापू पाटील, बाबाराजे देशमुख, बी. वाय. राऊत, हनुमंतराव सूळ, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सुरजाताई बोबडे, जिल्हा सरचिटणीस सचिनजी शिंदे, मंडल अध्यक्ष सुजयसिंह माने-पाटील, दत्ताजी जाधव यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक आणि भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनुजा खटके-पाटील यांची महसूल सहाय्यक अधिकारीपदी निवड

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महसूल विभागातील सहाय्यक अधिकारीपदी अनुजा सावळाराम खटके-पाटील यांची निवड झाल्याबद्दल तांबवे (टे.) येथे ग्रामस्थांतर्फे स्वागत व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर, ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माढा तालुका पंचायत समितीचे माजी सभापती विक्रमसिंह शिंदे होते. प्रास्ताविक व मनोगताद्वारे माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नागेश खटके-पाटील यांनी अनुजा यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी विक्रमदादा शिंदे, बंडू नाना ढवळे, सागर ढवळे आदींनी मनोगत व्यक्त करून अनुजा यांच्या यशाचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना अनुजा खटके-पाटील यांनी आपल्याला मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच खटके-पाटील कुटुंबीय, ग्रामस्थ व शुभेच्छुकांचे मनापासून आभार मानले.

कार्यक्रमास माढा तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बंडू नाना ढवळे, हरिदास मरकड, सागर ढवळे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे नूतन संचालक ब्रह्मदेव मरके, संजय पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र चौधरी, माजी सरपंच सागर ढवळे, तांबवे येथील नेते नागनाथ खटके, डॉ. भीमराव पवार, कल्याण अनपट, दत्तात्रय ढवळे, संग्राम देशमुख, नानासाहेब ढवळे यांच्यासह शेतकरी, तरुण मित्र, माता-भगिनी, नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस,
मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,
इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे
होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

**Classified - छोटी जाहीरात**

**बोअरवेल**

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फुट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. 9420766666

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, भाशी, ढेकुण, उंदीर, धुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर
उमेश माने मो. 9353370779
रेखा बर्वे मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आव्हानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे क्र.



**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण- *** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) मासाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दुध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात- ** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चतुर्थांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

**शब्दकोडे :**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | रू | ण | | रो | हि | त | | प्रि | त | म | |
| च | | | आ | ज | त | क | | यां | | ळ | |
| न | ऊ | | गा | गा | | दि | | का | ल | व | ड |
| ना | | स | मी | र | | र | वि | | ग | ट | र |
| मा | हे | र | | ह | क | | मा | | ब | | |
| | ड | | आ | मी | र | खा | न | | ग | ड | द |
| इ | मा | र | त | | | | त | वा | | ब | ण |
| रा | स्त | | | प | री | म | ळ | | मा | ल | क |
| दा | र | | अ | ना | म | त | | सू | न | | ट |
| | | नि | र | मा | | दा | स | बो | ध | | |
| रा | ग | | बा | | का | न | | ध | न | ग | र |
| ज | म | वा | ज | म | व | | घी | | | हू | |

# सेवा संकल्प अभियानातून स्वच्छता व लोकसहभागाचा संकल्प

सोलापूर,(कटूसत्य वृत्त):- उत्तर सोलापूर तालुक्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची' प्रभावी अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली असून, अभियानाच्या तालुकास्तरीय कक्षाचे उद्घाटन सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, अर्थ व बांधकाम समितीचे सभापती तथा उपाध्यक्ष इंद्रजीत पवार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते करण्यात आले.



या अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता, लोकसहभाग, सुशासन आणि विविध विकासात्मक उपक्रमांना चालना देण्यावर भर देण्यात येत आहे. याच अनुषंगाने 'एक दिवस स्वच्छतेसाठी' या उपक्रमांतर्गत स्वयंस्फूर्तीने गावाच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घेणाऱ्या उत्तर सोलापूर तालुक्यातील तरुणांचा जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. मार्डी, बीबीदारफळ, कौठाळी आणि अकोलेकाटी या गावांतील सरपंच तसेच स्वच्छता अभियानात स्वयंस्फूर्तीने सहभागी होणाऱ्या तरुणांचा यावेळी गौरव करण्यात आला. तरुणांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी इतर गावांसाठीही प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून 'सेवा संकल्प अभियानाचा' उत्साहात शुभारंभ करण्यात आला.

पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत अभियान प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यानंतर उत्तर सोलापूर पंचायत समिती परिसरातून बाईक रॅलीला उत्साहात सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी, पंचायत समिती सदस्य, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रॅली डफरीन चौकमार्गे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, रंगभवन येथे पोहोचली. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अर्थ व बांधकाम समितीचे सभापती तथा उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी स्वच्छतेसाठी पुढाकार घेणाऱ्या गावांचा आदर्श इतर गावांनी घ्यावा. आपापले गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा तसेच लोकसहभागातून स्वच्छतेचे विविध उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमास कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, उत्तर सोलापूर पंचायत समितीच्या सभापती तेजस्विनी बोराडे, उपसभापती सुनील भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी राजाराम भोंग यांच्यासह पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी,

अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. स्वच्छ गाव, सक्षम ग्रामपंचायत आणि सक्रिय लोकसहभाग या त्रिसूत्रीच्या माध्यमातून उत्तर सोलापूर तालुक्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला' गती देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

स्वच्छतेसाठी तरुणाईने घेतलेला पुढाकार, वृक्षारोपणातून दिलेला पर्यावरण संवर्धनाचा संदेश आणि लोकसहभागातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम यामुळे 'सेवा संकल्प अभियानाची' उत्तर सोलापूर तालुक्यात उत्साहपूर्ण सुरुवात झाली.

# महापौर विनायक कोंड्याल यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी अन्नदान

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिकेचे महापौर तथा प्रथम नागरिक विनायक कोंड्याल यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जुनी मिल चाळ गणेशोत्सव मंडळ (जीएमसी तरुण मंडळ) यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अन्न तृप्ती योजनेसाठी अन्नधान्याचे अन्नदान करण्यात आले. मंडळाच्या वतीने २५ पोते गहू, ५ पोते तांदूळ आणि २ तेलाचे डबे आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.



महापौर विनायक कोंड्याल यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचा उपक्रम मंडळाच्या वतीने घेण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू असलेल्या अन्न तृप्ती योजनेला हातभार लावत अन्नधान्याचे योगदान देण्यात आले. वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक उपक्रमातून तो साजरा करण्याचा मंडळाचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. या अन्नदान कार्यक्रमास मंडळाचे आधारस्तंभ डॉ. सूर्यप्रकाश कोठे तसेच नगरसेवक प्रथमेश कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अन्नधान्य आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सुपूर्द केले. जुनी मिल चाळ गणेश उत्सव तरुण मंडळ मुरार गणपती प्रतिष्ठान अध्यक्ष किशोर ढेकळे, उपाध्यक्ष राहुल ठावरे, दीपक मेंबर राजगे, बाळासाहेब ढेकळे,भोजराज माने,मल्लू सकट, सुरेंद्र शिंदे,अक्षय कोथिंबीरे, महेश(महाराज) चोरमुले ,विशाल गायकवाड, राहुल पवार,सौरभ वाघमारे, अमोल शिंदे, दीपक ढेकळे, गोपाल झिंगडे, अमित लामकाने शंकर माढेकर, गजेंद्र बांदेवाडेकर, बसु कोळी, सतीश गुंड, ओम चोरमुले, साईं राऊत,

जय चोरमुले, राजेंद्र शिंदे, विकी बाबा सूर्यवंशी, अमर वाघमोडे, बाळासाहेब ढेकळे, रुपेश अंधारे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अन्न तृप्ती योजनेसाठी करण्यात आलेल्या या अन्नदानामुळे सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देत समाजोपयोगी कार्य करण्याची परंपरा जुनी मिल चाळ जीएमसी तरुण मंडळाने यंदाही कायम ठेवली आहे.

# उद्योजकांच्या एकजुटीतून समृद्धीकडे वाटचाल

## ME- International Business Expo-2027 चा शुभारंभ

पुण(कटूसत्य वृत्त):- Maratha Entrepreneurs' -ssociation (ME-) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या "ME-International Business Expo २०२७' च्या लाँचिंग सोहळ्याचे उद्घाटन मा.खा. शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते पुणे येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास आमदार रोहित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. "Let's Grow Together' या ध्येयवाक्याने कार्यरत असलेली चए- संस्था उद्योजकांना एकत्र आणून व्यवसायवृद्धी, नेटवर्किंग, ज्ञानाची देवाणघेवाण आणि नवीन व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. यावेळी उपस्थित उद्योजकांशी संवाद साधताना मा.खा.श्री. शरदचंद्र पवार साहेब यांनी महाराष्ट्रातील उद्योजकतेच्या वाढीसाठी अशा व्यासपीठांची आवश्यकता अधोरेखित केली. नव्या पिढीतील उद्योजकांनी पारंपरिक व्यवसायासोबत आधुनिक तंत्रज्ञान, नवकल्पना आणि बदलत्या बाजारपेठेचा स्वीकार करून व्यवसायाचा विस्तार करावा, असे आवाहन त्यांनी केले.




आमदार रोहित पवार यांनीही यावेळी उपस्थित राहून चए- च्या कार्याचे आणि उद्योजकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. नवउद्योजकांना योग्य मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि बाजारपेठेशी जोडण्याचे काम अशा उपक्रमांमधून अधिक प्रभावीपणे होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. ME- International Business Expo २०२७ च्या माध्यमातून विविध उद्योगक्षेत्रांतील उद्योजक, व्यावसायिक, गुंतवणूकदार आणि ग्राहकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या Expo च्या माध्यमातून उद्योजकांना नवीन बाजारपेठा, व्यवसायविस्ताराच्या संधी, व्यावसायिक भागीदारी आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेटवर्किंग उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. MEAच्या Women Wing च्या माध्यमातून महिला उद्योजिकांना व्यवसाय क्षेत्रात प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महिला उद्योजकांचा सहभाग वाढवून त्यांना स्वतंत्र व्यावसायिक ओळख निर्माण करण्यासाठी चए- विशेष प्रयत्न करत आहे. या कार्यक्रमास MEA चे अध्यक्ष विक्रम गायकवाड, प्रवीणदादा गायकवाड, मा. अध्यक्ष अंकुश आसबे,अरुण निम्हण, नितीन भोसले, विजय गवारे,सई बहिरट सायली काळे,खजिनदार राजेश कुराडे यांच्यासह MEA चे पदाधिकारी, Core Members, विविध Chapter चे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते. "From Unity to Prosperity' या संकल्पनेतून उद्योजकांच्या एकजुटीला व्यवसायवृद्धी आणि आर्थिक प्रगतीची दिशा देत.

# सांगोल्यात रंगले काव्याचे बहारदार शब्दविश्व; 'कविसंमेलन' उत्साहात संपन्न!

सांगोला (कटूसत्य वृत्त):- येथील अमर गणेश मंडळ, वज्राबाद पेठ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'कविसंमेलन' गुरुवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता उत्साहात पार पडले. 'कविता नात्या गोत्याची, तुमच्या माझ्या घरातली' या आगळ्या-वेगळ्या संकल्पनेवर आधारित या कविसंमेलनाला रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी कवी महादेव कांबळे, कवी प्रेमकुमार वाघमारे, कवी इंद्रजीत धुले आणि कवी संतोष ओवाळ यांनी आपल्या विविध विषयांवरील कविता सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कवींनी सामाजिक विषय, दैनंदिन जीवनातील अनुभव,



नातेसंबंध, भावना तसेच विनोदी आणि मिश्कील शैलीतील कविता सादर केल्या. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. काही कविता मनाला भिडल्या, तर काही कवितांनी उपस्थितांना खळखळून हसवले. या कार्यक्रमामुळे गणेशोत्सवाच्या आनंदासोबतच सांगोल्यात साहित्य आणि काव्याची सुंदर मैफल रंगली. अमर गणेश मंडळाच्या या उपक्रमाचे उपस्थित रसिकांकडून कौतुक करण्यात आले.

# रांगोळीतून मोदींच्या कार्याला सलाम; ईच्छा भगवंताची परिवाराचा अनोखा संदेश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- नवभारताच्या निर्माणासाठी अखंड कार्यरत असलेले आणि 'राष्ट्र प्रथम' हा विचार सर्वोच्च मानून देशाच्या विकासासाठी योगदान देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देण्यात आल्या. सोलापूर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराजवळील श्री गणेश मंदिरासमोर नरेंद्र मोदी यांचे आकर्षक रांगोळीतील छायाचित्र साकारण्यात आले. या रांगोळीच्या माध्यमातून 'तीन तलाक'विरोधी कायदा, सामाजिक न्याय आणि मुस्लिम महिलांच्या सन्मानाचा संदेश अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. २०१९ मध्ये 'तीन तलाक'विरोधी कायदा अस्तित्वात आल्यानंतर मुस्लिम महिलांच्या विवाहविषयक अधिकारांच्या संरक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले. याच सामाजिक संदेशाला रांगोळीच्या माध्यमातून अधोरेखित करत ईच्छा भगवंताची परिवाराने मोदींच्या वाढदिवसानिमित्त आगळावेगळा उपक्रम राबविला. प्रारंभी श्री गणरायांच्या चरणी विधिवत पूजा करून दीपप्रज्वलन व महाआरती करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ एका पदावर असलेले नेतृत्व नसून देशाच्या विकासाची आणि राष्ट्रहिताची नवी दिशा दाखविणारे नेतृत्व आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या भावनेतून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय, सन्मान आणि समान संधी मिळावी, यासाठी विविध निर्णय घेण्यात आले. मुस्लिम महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेला 'तीन तलाक'विरोधी कायदा हा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण संदेश देणारा निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने रांगोळीच्या माध्यमातून मोदीजींचे छायाचित्र साकारून त्यांना शुभेच्छा देण्यामागे केवळ वाढदिवस साजरा करण्याचा उद्देश नाही, तर त्यांच्या राष्ट्रकार्याला आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांना सलाम करण्याची भावना आहे.



श्री गणरायांच्या चरणी मोदीजींना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे आणि भारताला अधिक सामर्थ्यवान, विकसित व आत्मनिर्भर बनविण्याच्या त्यांच्या कार्याला यश मिळावे, हीच प्रार्थना, असे जाधव यांनी सांगितले. याप्रसंगी स्थायी समिती सभापती सौ.रंजिता चाकोते,नगरसेवक विनोद भोसले,पश्चिम मंडल अध्यक्ष नागेश खरात,नगरसेविका सौ.अश्विनी चव्हाण, सौ.चैत्रालीताई शिवराज गायकवाड,स्वीकृत नगरसेवक अक्षय अंजीखाने, ज्ञानेश्वर माऊली म्याकल, नगरसेवक दायमा, नगरसेविका वृषाली चालुक्य, नगरसेविका सौ.कल्पना संतोष कदम सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड,युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, कार्तिक किसन जाधव,माणिक कांबळे, वसंत कांबळे, फिरोज पठाण,महादेव राठोड, सुनील कांबळे व परिवार तसेच महापालिकेतील विविध संघटनांचे कर्मचारी यांच्यासह ईच्छा भगवंताची मित्र परिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

मागील वर्षीच्या कार्यकाळातील सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे,शहराध्यक्ष सौ.रोहिणीताई तडवळकर तसेच भारतीय जनता पक्षाच्या सूचनेनुसार प्रथमच महापालिकेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# अफवांना पूर्णविराम ;पंचायत समिती सदस्य आ राजाभाऊ खरे यांच्या सोबतच

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- विधानसभा मतदारसंघातील पंचायत समिती सदस्य भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना पंचायत समिती सदस्यांनीच आमदार राजाभाऊ खरे यांची भेट घेऊन पूर्णविराम दिला. मोहोळ विधानसभा मतदारसंघात गेल्या काही दशकांपासून रखडलेल्या विकासकामांना आता गती मिळत असून विविध गावांतील रस्ते, पाणी, वीज, वाहतूक, शेती, शिक्षण तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लागत आहेत.अडले नडलेल्याना प्रतेक्ष्य ठोस आणि भर भक्कम मदत मिळत आहे. विकासकामांना मिळत असलेली गती पाहता काही विरोधकांकडून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी विविध प्रकारच्या अफवा पसरवल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.



नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत काही पंचायत समिती सदस्य भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा करण्यात आल्या आहेत. मात्र, या चर्चांच्या पार्श्वभूमीवर संबंधित पंचायत समिती सदस्यांनी स्वतः आमदार राजाभाऊ खरे यांची भेट घेतली. यावेळी आम्ही आपल्या सोबत आहोत आणि आपल्या सोबतच राहणार आहोत, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. आमदार खरे यांच्या म्हणण्यानुसार, या भेटीदरम्यान पंचायत समिती सदस्यांनी आपली भूमिका स्पष्ट करत एकजुटीने काम करण्याचा विश्वास दिला. त्यामुळे सुरू असलेल्या चर्चांपेक्षा संबंधित सदस्यांनी प्रत्यक्ष भेटीत व्यक्त केलेली भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार राजाभाऊ खरे यांची भेट घेणाऱ्या पंचायत समिती सदस्यांमध्ये बाळासाहेब गायकवाड (पंचायत समिती सदस्य सय्यद वरवडे), धनाजी माळी (पंचायत समिती सदस्य कुरुल ), डॉ. अमित व्यवहारे (पंचायत समिती सदस्य आष्टी), गणेश मूळे (पंचायत समिती सदस्य खंडाळी), सौ. संगीता वसेकर (पंचायत समिती सदस्य पेनूर) आणि प्रथमेश संजय वसेकर संगीता वसेकर यांचे चिरंजीव यांचा समावेश आहे दरम्यान, राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत राहतात; मात्र मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडवणे आणि विकासकामांना गती देणे हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे, अशी भूमिका आमदार राजाभाऊ खरे यांची आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्यावर भर राहणार असून अफवा आणि चर्चांपेक्षा प्रत्यक्ष विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असेही आमदार खरे यांची भूमिका आहे.

# जिजाऊ-सावित्रीच्या रूपात प्रबोधनाची गौराई;सह्याद्री परिवाराची २२ वर्षांची परंपरा

माढा (कटूसत्य वृत्त):- माढ्यातील फक्त सह्याद्री परिवाराच्या वतीने जिजाऊ-सावित्रीच्या रुपात २२ वर्षापासून प्रबोधनाच्या गौराई उभ्या केल्या जातात. यंदा -ख च्या जमान्यात माणूसकी जपूया ही आरास उभारली आहे. छत्रपती शिवाजी महाराज नगरमधील फक्त सह्याद्री परिवाराच्या वतीने माँसाहेब जिजाऊ क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या रुपात महालक्ष्मी ची उभारणी मागील २२ वर्षापासुन हा परिवार पुस्तकरूपी आरास उभी करुन पुस्तके वाचण्याचा संदेश देत आहे. दरवर्षी हा परिवार नाविन्य पुर्ण आरास उभा करत असतात. यंदा या परिवारातील शारदा शिंदे,धनश्री शिंदे,भाग्यश्री शिंदे यांनी पुस्तकाच्या आरास सोबतच सध्याच्या हायटेक -ख च्या जमान्यात माणूसकी जपूया या ज्वलंत विषयावर आरास साकारली आहे. -ख या हायटेक तंत्रज्ञानासह सोशल मिडीयाच्या जाळ्यात प्रत्येक जण अडकत चालल्यामुळे घरातला संवाद हरवत चालल्याचे तसेच तरुणाई एकलकोंडी कशी होत आहेत.वाचनसंस्कृती कशी लोप पावत चालली आहे.याचे चित्रण दाखवत असलेला देखावा सादर केला आहे. देखावा पहायला आलेल्या महिलांना शिंदे परिवार प्रबोधनात्मक पुस्तके रुपी भेट देत आहेत.आरास उभारणीसाठी दत्ताजी शिंदे,संदीप शिंदे,जयदीप शिंदे,शिवतेज शिंदे,संदेश शिंदे,शिवकन्या शिंदेनी सहकार्य केले.



# मोफत रोबोटिक सांधेरोपण व ऑर्थोपेडिक तपासणी शिबीर- डॉ. अनिरुद्ध पाटील

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूरात हॉस्पिटल क्षेत्रात अत्यंत नावाजलेल्या सिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये गरजू रुग्णांकरिता बुधवारी मोफत सांधेरोपण आणि ऑर्थोपेडिक (अस्थिरोग) आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे असल्याचे डॉक्टर अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.

हे शिबिर सिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये सकाळी दहा ते एक या दरम्यान संपन्न होणार असून याकरिता नाव नोंदणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबीरात रोबोटिक सांधेरोपण करण्यात येणार असून सुप्रसिद्ध सर्जन डॉ. अनिरुद्ध पाटील रुग्णांची



मोफत तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबीराची प्रमुख वैशिष्ट्ये सांगताना डॉ पाटील म्हणाले की

सांधेदुखी सल्ला तीव्र Knee Arthritis, Hip Arthritis, Shoulder Arthritis आणि

रोबोटिक सांधेरोपण माहिती: अत्याधुनिक रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेबाबत महत्त्वाचा सल्ला दिला जाणार आहे.

तसेच स्पोर्ट्स इंज्युरी म्हणजे खेळाडूंना होणाऱ्या स्नायू व सांध्यांच्या दुखापतींवर (Sports Injuries) विशेष मार्गदर्शन देखील यावेळी करण्यात येणार आहे. दुसरे वैद्यकीय मत (Second Opinion): सांधेरोपण शस्त्रक्रियेचा सल्ला दिलेल्या रुग्णांसाठी विनामूल्य मार्गदर्शन असणार आहे.

सोलापूर शहर व परिसरातील सांधेदुखी व हाडांच्या आजारांनी त्रस्त असलेल्या नागरिकांनी या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन पाटील परिवाराकडून करण्यात आले आहे.

**डॉ. अनिरुद्ध पाटील हे अस्थिरोग आणि सांधेरोपण क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर आहेत. त्यांनी , MBBS, MS (ORTH) सह FIJR(बंगळुरू), FISM (दिल्ली),FISS(मुंबई) या उच्च पदविका आणि इंग्लंड येथून रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट फेलोशिप प्राप्त केली आहे. अत्याधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक सांधेरोपण शस्त्रक्रिया करण्यात त्यांचा विशेष हातखंडा आहे**